महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४७५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

संकेतस्थळावर जाहीर सूचना : मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत संस्थाबाबत

क्रमांक: १०/पदविका/मा.प्र./अनधिकृतसंस्था /२०२५/ १५१ दिनांक : 8 MAY 2025

**मान्यता नसलेल्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक पदवी, पदव्युत्तर पदविका (Diploma, UG Degree, PG Degree, Integrated Degree Courses, PG Diploma) या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत, महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, प्लॅनिंग, अभिकल्प, बीबीए/बीएमएस/बीबीएम, बीसीए या पदवी तसेच एमबीए / एमएमएस, एमसीए, एम. फार्मसी, एम.ई./एम.टेक., एम. आर्किटेक्चर, एम. एचएमसीटी, फार्म. डी. फार्म. डी. (Post Baccalaureate), अभिकल्प, प्लॅनिंग या पदव्युत्तर पदवी त्याचप्रमाणे प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.प्लॅनिंग, एम.एचएमसीटी, एमबीए/एमएमएस, एमसीए हे एकात्मिक पदवी अभ्यासक्रम (Integrated) व ज्या अभ्यासक्रमांत थेट द्वितीय वर्षात प्रवेश दिला जातो, त्या अभ्यासक्रमांसाठीच्या कार्यरत व्यावसायिकांची (Working Professionals) स्वतंत्र तुकडी इत्यादी अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर / विदयापीठ अनुदान आयोग / विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या https://dte.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी / माहिती उपलब्ध आहे.

येथे असे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदाअनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. तसेच दि.०८.१०.२०२४ रोजी महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम ( तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर / विदयापीठ अनुदान आयोग/ विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरण व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ / संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/ विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.